भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.४०५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०५/२०१७

**१) चिचोली शेतशिवारात हवामान केन्द्रातील खुल्या जागेतील सुर्यप्रकाश व तिव्रता मापक यंत्राची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०५/२०१७ ते १७/०५/२०१७ चे १७.३० ते ०८.०० वा. दरम्यान यातील जलविज्ञान प्रकल्प उपविभाग–नागुपर अंतर्गत चिचोली शेतशिवारात हवामान केंन्द्र असुन या केन्द्रातील खुल्या जागेतील सुर्यप्रकाश व तिव्रता मापक यंत्र (काचेचा गोळा) किंमती १५,०००/–रु. चा कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी कुमारी मोनीका देवीदास कायरकर वय २६ वर्ष साहाय्यक अभीयंता जलविज्ञान कार्यालय कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) अल्टो गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २३/०५/२०१७ चे ०६.१५ ते ०८.०० वा. दरम्यान यातील मृतक राजु चित्तरंजन दास वय ३१ वर्ष, रा. अरुण नगर हा आपली पल्सर मोटार सायकल क्रमांक एमच ३५ एडी २५७४ नी लाखांदुर मार्ग नागपुरकडे जात असता यातील आरोपी चार चाकी अल्टो गाडी चा चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपने चालवुन मृतकचे मोटार सायकला आसगाव ते बोरगाव गावचे मधात रोडवर येथे धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी चित्तरंजन कुंजु दास वय ५८ वर्ष, रा. अरुण नगर तहसिल मोरगाव अर्जुनी जिल्हा गोदिंया यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) ट्रक सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २३/०५/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक सार्वजनीक ठिकाणी आमरोड वर थांबवुन जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांना व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या प्रकारे थांबवुन ठेवलेल्या व वाहनाचे कागदपत्र सोबत न बाळगल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम २८३ भांदवी. सहकलम १३०/१७७,१३९ सीएमव्हीआर/ १७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) वाही पाटबंधारे विभागा समोर वृध्दा इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक २२/०५/२०१७ ते २३/०५/२०१७ चे रात्र दर. यातील मृतक दशरथ रेहु गजभिये वय ८५ वर्ष, सोमवारी वार्ड पवनी हा मृत अवस्थेत वाही पाटबंधारे विभाग समोर मिळुन आल्याने फिर्यादी भोजराम केवळ गयभिये वय ४० वर्ष, रा. घाटउमरी जि. नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) घरी मृत अवस्थेत वृध्द इसम मिळुन आल्याने मर्ग नोंद . :—**

दिनांक २२/०५/२०१७ चे २०.०० ते २३/०५/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील मृतक तुळसीराम विठोबा पचारे वय ७० वर्ष हा आपले घरी मरण पावलेल्या अवस्थेत फिर्यादीस मिळुन आल्याने फिर्यादी जयसिंग राजाराम मेश्राम वय ५४ वर्ष, रा. बोरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भांगाडे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**६) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :—**

दिनांक २४/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. लाखांदुर येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ६६८ लिटर ३४० मिली लिटर देशी दारु/मारुती वॅगेनार/मोबाईल ६ किंमती ७००५७६/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २४/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०५ तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(पोनि जी. आर कंकाळे)
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा
दुरध्वनी.क्र ९८२३९११०१७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.